जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 NOV 2024
सकाळ

# संविधान अमृतमहोत्सवाचा आजपासून जागर

## विद्यापीठात विविध उपक्रमांचे आयोजन



कोल्हापूर, ता. २५ : भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाने संविधान सप्ताह साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निमित्ताने संविधानाचा जागर करणाऱ्या विविध प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. विद्यापीठाच्या विविध अधिविभागांसह जनसंपर्क कक्ष, कोल्हापूर प्रेस क्लब या उपक्रमांत सहभागी होणार आहेत, अशी माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली.

या संविधान सप्ताहामध्ये उद्या, मंगळवारी सकाळी साडेदहा वाजता मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन आणि त्यानंतर मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर संविधानाधारित पथनाट्य सादरीकरण, 'भारतीय संविधान आणि प्रसारमाध्यमे' या विषयावर गोलमेज परिषद होणार आहे. बुधवारी सकाळी साडेदहा वाजता शिक्षणशास्त्र अधिविभागातर्फे 'भारतीय संविधानिक मूल्ये आणि शिक्षण' या विषयावरील पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन, 'भारतीय संविधान आणि विकसित भारत' या विषयावर डॉ. श्रीरंजन आवटे यांचे व्याख्यान होईल. गुरुवारी सकाळी अकरा वाजता 'भारतीय संविधानातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समता आणि धर्मनिरपेक्षता' या विषयावर डॉ. सुरेंद्र जोंधळे यांचे व्याख्यान आणि 'संविधान साक्षरता' या विषयावर निमंत्रितांची चर्चा होईल. शुक्रवारी सकाळी अकरा वाजता 'भारतीय संविधानाचे आजच्या भारतासाठीचे महत्त्व' या विषयावर ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांचे, तर शनिवारी सकाळी अकरा वाजता डॉ. रविनंद होवाळ यांच्या 'भारतीय संवैधानिक मूल्ये' या विषयावरील व्याख्यानाने सप्ताहाचा समारोप होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

26 NOV 2024 पुढारी

# शिवाजी विद्यापीठात भारतीय संविधान अमृतमहोत्सवानिमित्त विविध उपक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतीय राज्यघटनाकारांनी देशाला संविधान अर्पण केल्याच्या घटनेला २६ नोव्हेंबर रोजी ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. संविधान अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाने संविधान सप्ताह साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निमित्ताने संविधानाचा जागर करणाऱ्या विविध प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन केले आहे, अशी माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक तथा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली.



शिवाजी विद्यापीठातून

मंगळवार, दि. २६ रोजी सकाळी १०.३० वाजता मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन, १०.४५ वाजता मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर संविधानाधारित पथनाट्य सादरीकरण, ११ वाजता डॉ. ग. गो. जाधव अध्यासन इमारतीमध्ये 'भारतीय संविधान आणि प्रसारमाध्यमे' या विषयावर गोलमेज परिषद, दुपारी २.३० वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली सप्ताहाचा औपचारिक उद्घाटन समारंभ होणार आहे.

बुधवार, दि. २७ रोजी सकाळी १.३० वाजता शिक्षणशास्त्र अधिविभागातर्फे 'भारतीय संविधानिक मूल्ये आणि शिक्षण' या विषयावरील पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन, ११ वाजता 'भारतीय संविधान आणि विकसित भारत' या विषयावर डॉ. श्रीरंजन आवटे (पुणे) यांचे विशेष व्याख्यान होईल. गुरुवार, दि. २८ रोजी सकाळी ११ वाजता 'भारतीय संविधानातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समता आणि धर्मनिरपेक्षता' या विषयावर डॉ. सुरेंद्र जोंधळे यांचे व्याख्यान होणार आहे.

शुक्रवार, दि. २९ रोजी सकाळी ११ वाजता 'भारतीय संविधानाचे आजच्या भारतासाठीचे महत्त्व' या विषयावर ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांचे विशेष व्याख्यान होणार आहे. शनिवार, दि. ३० रोजी सकाळी ११ वाजता भारतीय संविधान अमृतमहोत्सव सप्ताहाच्या समारोप समारंभ प्रसंगी डॉ. रविनंद होवाळ यांचे 'भारतीय संवैधानिक मूल्ये' या विषयावर विशेष व्याख्यान होणार आहे.

2 6 NOV 2024
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संविधानाच्या अमृतमहोत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठात विविध उपक्रम

## विद्यार्थ्यांसह सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारतीय राज्यघटनाकारांनी देशाला संविधान अर्पण केल्याच्या घटनेला येत्या २६ नोव्हेंबर रोजी ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या संविधान अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाने संविधान सप्ताह साजरा करण्याचा निर्णय घेतला असून या निमित्ताने संविधानाचा जागर करणाऱ्या विविध प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिविभागांसह जनसंपर्क कक्ष आणि कोल्हापूर प्रेस क्लब या उपक्रमांत सहभागी होणार आहे. शिवाजी विद्यापीठातर्फे मानव्यशास्त्र सभागृहात आयोजित या विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांसह समाजातील सर्वच घटकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक तथा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

**संविधान सप्ताहाचा कार्यक्रम –**

२६ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन, १०.४५ वाजता मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर संविधानाधारित पथनाट्य सादरीकरण, ११ वाजता कै. डॉ.ग.गो. जाधव अध्यासन इमारतीमध्ये भारतीय संविधान आणि प्रसारमाध्यमे यावर गोलमेज परिषद, दुपारी २.३० वाजता कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली सप्ताहाचा औपचारिक उद्घाटन समारंभ होणार आहे.

२७ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या वतीने आयोजित भारतीय संविधानिक मूल्ये आणि शिक्षण या विषयावरील पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन, ११ वाजता भारतीय संविधान आणि विकसित भारत या विषयावर डॉ. श्रीरंजन आवटे (पुणे) यांचे विशेष व्याख्यान होणार आहे.

२८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता भारतीय संविधानातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समता आणि धर्मनिरपेक्षता यावर डॉ. सुरेंद्र जोंधळे यांचे व्याख्यान होणार असून व्याख्यानानंतर लगेचच संविधान साक्षरता या विषयावर विशेष निमंत्रितांची चर्चा आयोजित करण्यात आली आहे.

२९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता भारतीय संविधानाचे आजच्या भारतासाठीचे महत्त्व या विषयावर ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांचे विशेष व्याख्यान होणार आहे. ३० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता भारतीय संविधान अमृतमहोत्सव सप्ताहाच्या समारोप समारंभ प्रसंगी डॉ. रविनंद होवाळ यांचे भारतीय संवैधानिक मूल्ये या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. २६ नोव्हेंबरपासून 'भारतीय संविधान निर्मिती' या विषयावरील चित्रफीतींचे शिवाजी विद्यापीठाच्या 'शिव–वार्ता' या युट्यूब वाहिनीवर प्रसारण करण्यात येणार असून त्यावर आधारित विशेष प्रश्नमंजुषा स्पर्धाही या निमित्ताने आयोजित करण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 NOV 2024
लोकमत

# विद्यापीठात आज गोलमेज परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा मास कम्युनिकेशन अधिविभाग, कोल्हापूर प्रेस क्लब आणि विद्यापीठाचा जनसंपर्क कक्ष यांच्या वतीने आज मंगळवारी 'भारतीय राज्यघटना आणि प्रसारमाध्यमे' या विषयावर गोलमेज परिषद होणार आहे. मास कम्युनिकेशन अधिविभागात सकाळी ११ वाजता होणाऱ्या परिषदेच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन असतील.

या परिषदेत विद्यापीठाच्या विविध अधिविभागाचे प्रमुख आणि वेगवेगळ्या विषयांचे प्राध्यापक तसेच कोल्हापूर प्रेस क्लबचे पदाधिकारी आणि ज्येष्ठ संपादक, पत्रकार सहभागी होणार आहेत. ही परिषद सर्वांसाठी खुली असून, यात जास्तीत जास्त लोकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर आणि प्रेस क्लबचे अध्यक्ष शीतल धनवडे यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 NOV 2024
लोकमत

# संविधान अमृतमहोत्सव; विद्यापीठात विविध उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारतीय राज्यघटनाकारांनी संविधान देशाला अर्पण केल्याच्या घटनेला येत्या २६ नोव्हेंबरला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या संविधान अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठात संविधान सप्ताह साजरा करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक तथा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली.

आज, मंगळवारी सकाळी १०:३० वाजता मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन, पथनाट्य सादरीकरण, गोलमेज परिषद होणार आहे. उद्या, बुधवारी सकाळी १०:३० वाजता पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन, सकाळी ११ वाजता - भारतीय संविधान आणि विकसित भारत या विषयावर डॉ. श्रीरंजन आवटे यांचे विशेष व्याख्यान होईल. गुरुवारी डॉ. सुरेंद्र जोंधळे यांचे व्याख्यान होईल. व्याख्यानानंतर लगेचच संविधान साक्षरता या विषयावर विशेष निमंत्रितांची चर्चा होईल. शुक्रवारी सकाळी अकरा वाजता ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांचे विशेष व्याख्यान होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 NOV 2024
तरुण भारत

# संविधान सप्ताहाचे आज उद्घाटन

कोल्हापूर : भारतीय राज्यघटनाकारांनी संविधान देशाला अर्पण केल्याच्या घटनेला आज (दि. २६) ला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या संविधान अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठातर्फे संविधान सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. हा संविधान सप्ताह २६ ते ३० नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार असून, विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या सप्ताहाचे उद्घाटन सकाळी १०.३० वाजता प्रशासकीय इमारतीमध्ये संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचनाने होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 NOV 2024
तरुण भारत

# विद्यापीठात आज गोलमेज परिषद

कोल्हापूर : भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठात मास कम्युनिकेशन अधिविभाग, कोल्हापूर प्रेस क्लब आणि जनसंपर्क कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने २६ रोजी 'भारतीय राज्यघटना आणि प्रसारमाध्यमे' या विषयावर गोलमेज परिषद होणार आहे. मास कम्युनिकेशन अधिविभागात सकाळी ११ वाजता होणाऱ्या या परिषदेच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन आहेत. या परिषदेत विद्यापीठातील अधिविभागप्रमुख, प्राध्यापक तसेच कोल्हापूर प्रेस क्लबचे पदाधिकारी आणि ज्येष्ठ संपादक, पत्रकार सहभागी होणार आहेत. तरी सर्वांनी या परिषदेसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, प्रेस क्लबचे अध्यक्ष शीतल धनवडे यांनी केले.

26 NOV 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशवंतरावांकडून संरक्षण धोरणांची पायाभरणी

## ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार : शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यान

कोल्हापूर, ता. २५ : 'संरक्षणमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांची भूमिका ही जरी छोट्या काळाची असली, तरी ती अत्यंत प्रभावशाली होती. त्यांच्या नेतृत्वामुळे भारताने कठीण काळातून मार्गक्रमण केले. पुढील दशकांमध्ये अनेक संरक्षण धोरणांची पायाभरणी केली. चव्हाण यांचा कार्यकाळ भारतीय संरक्षण इतिहासात एक महत्त्वाचा टप्पा ठरला', असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार, राजकीय विश्लेषक श्रीराम पवार यांनी आज येथे केले.



कोल्हापूर : विशेष व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार. यावेळी डॉ. नितीन माळी, एम. एस. देशमुख, उमेश गडेकर उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण अध्यासन आणि यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास प्रशालेतर्फे 'संरक्षणमंत्री-यशवंतराव चव्हाण' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात त्यांनी विचार मांडले. मानव्यशास्त्र सभागृहातील या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी मानव्यविद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. एम. एस. देशमुख होते.

पवार म्हणाले, 'संरक्षणमंत्री म्हणून चव्हाण यांना भारताच्या संरक्षण संरचनेचे आधुनिकीकरण करण्याची आणि सशस्त्र दलांची क्षमता वृद्धीकरणाची आव्हाने होती. त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय लष्कराला मनोबल आणि उपकरणांबाबतीत उचल दिली गेली. त्यांनी नागरी आणि लष्करी नेतृत्वामधील संबंध सुधारण्यावर लक्ष केंद्रित केले. ज्यामुळे लष्करी नेतृत्वाला रणनैतीक संरक्षणावर लक्ष केंद्रित करता आले आणि जागतिक राजकारणाची गुंतागुंत सावरणे शक्य झाले.' डॉ. उमेश गडेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. उर्मिला दशवंत यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

26 NOV 2024

तरुण भारत



कोडोली : येथील वासंतीदेवी फार्मसीला नॅकचे ए श्रेणी मानांकन मिळाल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाकडून सत्कार स्वीकारताना प्राचार्य डॉ. ए. एस. मंजाप्पा, डॉ. गौरीसंकर व सौ वैशाली पवार.

# वासंतीदेवी फार्मसीला नॅकचे 'ए' श्रेणी मानांकन

वारणानगर

प्रतिनिधी

कोडोली (ता. पन्हाळा) येथील श्री यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वासंतीदेवी पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीस राष्ट्रीय मूल्यमापन समिती (नॅक) बेंगलोर यांच्याकडून 'ए' श्रेणी (३.०७) मानांकन मिळाल्याबद्दल शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्यामार्फत सत्कार करण्यात आला. हा सत्कार स्वीकारण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एस. मंजाप्पा, नॅक समन्वयक डॉ. गौरीसंकर व कार्यालयीन अधीक्षक वैशाली पवार उपस्थित होते.

फार्मसी महाविद्यालयास राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद मूल्यांकन प्राप्त झाले. या प्रक्रियेमध्ये शैक्षणिक गुणवत्ता, महाविद्यालयात वापरली जाणारी शैक्षणिक प्रणाली, अभ्यासक्रमाचे नियोजन, प्राध्यापकांची शैक्षणिक पात्रता, संशोधनकार्य, माजी विद्यार्थी व पालक अभिप्राय, समाज उपयोगी उपक्रम, सुविधा क्रीडा, विद्यार्थ्यांच्या इतर कलागुणांना वाव देण्यासाठी वापरली जाणारी प्रक्रिया, सांस्कृतिक विभागाची कामगिरी, पर्यावरण पूरकता यांचा प्रामुख्याने समावेश असतो.

महाविद्यालयाच्या या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा पद्मजा पाटील, संस्थेचे सचिव डॉ. जयंत पाटील व विश्वस्त विनिता पाटील यांनी अभिनंदन करून महाविद्यालयाचा शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला असल्याचे सांगितले. या आनंदोत्सवात महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

26 NOV 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संगणक प्रणालीतून 'सेट' केलेल्या प्रश्नपत्रिका

## परीक्षा मंडळाचे नवे पाऊल : 'एसआरपीडी'च्या माध्यमातून वितरण

**संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २५ : अचूकता आणि वेळेची बचत व्हावी, या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने संगणक प्रणालीतून प्रश्नपत्रिकांची निर्मिती (पेपर सेटिंग) करण्याचे नवे पाऊल टाकले आहे. या प्रश्नपत्रिकांचा वापर हिवाळी सत्रातील विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षेसाठी उद्या, मंगळवारपासून होणार आहे.

घटत्या मनुष्यबळावर पर्याय म्हणून विद्यापीठाने 'आयसीटी'चा वापर वाढविला आहे. त्यात परीक्षा मंडळ आघाडीवर आहे. या मंडळासमोर परीक्षेतील महत्त्वाचा टप्पा असणाऱ्या पेपर सेटिंगमध्ये नावीन्यता, अचूकता आणण्याचे आव्हान होते. आतापर्यंत पेपर सेटिंग हस्तलिखित पद्धतीने केले जात होते. त्यात वेळ, आर्थिक खर्च वाढण्यासह प्रश्नपत्रिकेमध्ये काहीवेळा त्रुटी देखील राहत होत्या. ते टाळण्यासाठी परीक्षा नियुक्ती विभाग आणि संगणक केंद्राने एकत्रितपणे काम करून पेपर सेटिंगसाठीची संगणक प्रणाली विकसित केली. त्याचा वापर करून प्राध्यापकांच्या मदतीने पेपर सेटिंगची प्रक्रिया गतिमान केली आहे.



या प्रणालीतून तयार केलेल्या प्रश्नपत्रिकांचा वापर उद्या, मंगळवारपासून होणाऱ्या बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., एमबीए., एम. एस्सी., एम. कॉम. आदी विद्यार्थी संख्या मोठी असलेल्या अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी केला जाणार आहे. या प्रश्नपत्रिकांचे वितरण देखील विद्यापीठाने स्वःनिर्मिती केलेल्या एसयूके प्रश्नपत्रिका वितरण संगणक प्रणालीच्या (एसआरपीडी) माध्यमातून केले जाणार आहे. पूर्वी ही प्रणाली बाह्य पुरवठादारकडून विद्यापीठ घेत होते. त्या खर्चात देखील आता बचत होणार आहे.

> 'एसआरपीडी, पेपर सेटिंगची प्रणालीच्या वापराने वेळ, आर्थिक खर्चात बचत होणार आहे. कागदाचा वापर कमी होणार असल्याने पर्यावरण रक्षणाला देखील बळ मिळणार आहे.
>
> **-डॉ. निवास माने,** उपकुलसचिव, परीक्षा नियुक्ती विभाग

### त्रुटींचे निवारण 'ऑनलाईन'

या एसआरपीडी प्रणालीमध्ये शिक्षक, विद्यार्थी, एसआरपीडी समन्वयकांच्या प्रश्नपत्रिकांबाबतच्या त्रुटींचे निवारण करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल उपलब्ध करून दिले आहे. त्यावर दाखल होणाऱ्या त्रुटींच्या निवारणाची गती वाढणार आहे. या पोर्टलमध्ये नोटिफिकेशन यंत्रणेची सुविधा दिली आहे. त्याद्वारे परीक्षाविषयक संदेश हे डॉक्युमेंट, व्हाईस मेसेज, ई-मेलद्वारे एकाचवेळी सर्व एसआरपीडी समन्वयक, परीक्षाविषयक काम करणाऱ्या घटकांना पाठविला जाणार आहे.

### आतापर्यंत ७७७ विषयांचे पेपर 'सेट'

संगणक प्रणालीच्या वापरातून पेपर सेट केल्याने त्याच्या प्रक्रियेमध्ये सूत्रबद्धता येणार आहे. या प्रणालीतून आतापर्यंत ७७७ विषयांचे पेपर सेट करण्यात आले आहेत. त्यात कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेतील अभ्यासक्रमांच्या विषयांचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 NOV 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ महिला संघ जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आचार्य नागार्जुन विद्यापीठ, नागार्जुननगर येथे दि. २६ ते २८ नोव्हेंबरअखेर होणाऱ्या दक्षिण-पश्चिम आंतर विभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेकरिता शिवाजी विद्यापीठ महिला संघ रवाना झाला. संघामध्ये विविध महाविद्यालयातून १० महिला खेळाडूंची निवड करण्यात आली आहे.

साक्षी सांडुगडे-कोल्हापूर, सरिता सावंत-कोल्हापूर, निकिता कमलाकर -कुरुंदवाड, भूमिका मोहिते-अर्जुननगर, काजल सरगर-सांगली, राजनंदिनी आमने-इचलकरंजी, राजलक्ष्मी पोवार-इचलकरंजी, स्नेहा आमने - इचलकरंजी, प्राजक्ता साळुंखे -सातारा, अपेक्षा ढोणे-सातारा यांचा संघात समावेश आहे. संघ व्यवस्थापक म्हणून देवचद कॉलेज अर्जुननगरचे डॉ. रवींद्र चव्हाण व प्रशिक्षक म्हणून शहाजी कॉलेज कोल्हापूरचे डॉ. प्रशांत पाटील काम पाहणार आहेत. संघाला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा विभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, डॉ. सुचय खोपडे यांचे प्रोत्साहन लाभले.